RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ४०]     सोमवार, मार्च २७, २०२३/चैत्र ६, शके १९४५     [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १०१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, पहिला मजला, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ मार्च, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन-२०२२/प्र.क्र.१७०/ज-१.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. अधि. ४१) च्या कलम २९अ आणि कलम ३२८, अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम,२०१९" यामध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने खालील नियम करण्याचे योजिले आहे. उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या, पोट-कलम(१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, सदर नियम पूर्व प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.—

१. या नियमांना, "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) (सुधारणा) नियम,२०२३" असे म्हणावे.

२. "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम,२०१९ (ज्यांचा यापुढे "प्रमुख नियम" म्हणून उल्लेख केलेला आहे.) च्या नियम ३ मध्ये खालील सुधारणा करण्यात येत आहे,—

(१) उप-नियम (१) मधील "भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या" या मजकुराऐवजी "भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीच्या प्रदानानंतर, त्या जमिनीचा मूळ मंजूर प्रयोजनार्थ प्रत्यक्ष वापर सुरू होऊन, ५ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच त्या", हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) उप-नियम (४) मध्ये,—

(१) तक्त्यापूर्वी खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहेत :—

"परंतु, भोगवटादार वर्ग-२ अथवा भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीचे रूपांतरण करण्यासाठीच्या अधिमूल्याची रक्कम रू. १ कोटीपेक्षा अधिक येत असेल, अशा प्रकरणी राज्य शासनाची

पूर्वमान्यता (जमीन प्रदान केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) घेतल्या खेरीज, जिल्हाधिकारी, अशा जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरणाचे कोणतेही आदेश पारीत करू शकणार नाहीत."

"परंतु आणखी असे की, भोगवटादार वर्ग-२ अथवा भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या, अशा विवक्षित प्रकरणी मूळ मंजूर प्रयोजनासाठीचा प्रत्यक्ष वापर सुरू केल्याच्या दिनांकापासून ५ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्याखेरीज, जिल्हाधिकारी, अशा जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरणाचे कोणतेही आदेश पारीत करू शकणार नाहीत."

(२) तक्त्यामध्ये—

**(अ)** परिच्छेद (अ)—

(१) रकाना क्रमांक (३) येथील शीर्षकामध्ये **'तीन वर्ष '** या मजकुराऐवजी **'पाच वर्ष '** हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) रकाना क्रमांक (४) येथील शीर्षकामध्ये **'तीन वर्ष'** या मजकुराऐवजी **'पाच वर्ष'** हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**(ब)** परिच्छेद (ब)—

(१) रकाना क्रमांक (३) येथील शीर्षकामध्ये **'तीन वर्ष'** या मजकुराऐवजी **'पाच वर्ष'** हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) रकाना क्रमांक (४) येथील शीर्षकामध्ये **'तीन वर्ष'** या मजकुराऐवजी **'पाच वर्ष'** हा मजकूर दाखल करण्यात येईल.

३. उक्त प्रमुख नियमांमधील अधिमूल्याची रक्कम समायोजित करण्याबाबतचा नियम ४ हा वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुनिल कोठेकर,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 27th March, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Jamin-2021/C.R.170/J-1.— In exercise of the powers conferred by sections 29A and 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, hereby makes the following rules to amend the Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy Class-II and Leasehold lands into Occupancy Class-I lands) Rules, 2019, the same having been previously published as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy Class-II and Leasehold lands into Occupancy Class-I lands) (Amendment) Rules, 2023.

2. In rule 3 of the Maharashtra Land Revenue (Conversion of Occupancy Class-II and Leasehold lands into Occupancy Class-I lands) Rules, 2019 (hereinafter referred to as "the principal Rules"),—

(1) in sub-rule (*1*) for the words "leasehold basis" the words "leasehold basis, after lapse of the period of five years from the date of commencement of actual use of land for which the land was granted originally," shall be substituted;

(2) to sub-rule (*4*),—

(I) before the Table, the following provisos shall be inserted, namely :—

"Provided that, the Collector shall not pass any order to convert the Occupancy Class-II land or leasehold land into Occupancy Class-I land in cases, where the premium for such conversion exceeds rupees one crore unless prior approval of the State Government (except the land granted to Co-operative Housing Society), is obtained:

Provided further that, the Collector shall not pass any order to convert the Occupancy Class-II land or leasehold land into Occupancy Class-I land only in such cases where the period of five years from the date of commencement of actual use of land for which the land was granted originally has lapsed.";

(II) in the Table,—

*(a)* in paragraph (A),—

*(i)* in column (3), in the heading, for the words "three years" the words "five years" shall be substituted;

*(ii)* in column (4), in the heading, for the words "three years" the words "five years" shall be substituted;

*(b)* in paragraph (B),—

*(i)* in column (3), in the heading, for the words "three years" the words "five years" shall be substituted;

*(ii)* in column (4), in the heading, for the words "three years" the words "five years" shall be substituted.

3. Rule 4 of the principal Rules relating to adjustment of premium shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUNIL KOTHEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.